**कोविड-१९ या महामारीच्या परिस्थितीमध्ये मृतदेह हाताळण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -२०२०/प्र.क्र.१२४/ आरोग्य -३अ**
ए विंग ,१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत
लोकमान्य टिळक मार्ग , मुंबई- ४०० ००१
दिनांक: १३ मे, २०२०.

संदर्भ-

१) **शासन परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक - संकिर्ण ०४२०/प्र.क्र.५२/ विशा-१ अ , दिनांक- ०७.०४.२०२०.**

२) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्रमांकः राआसो/ कोरोना नियंत्रण कक्ष/ मुंबई / २५४०-४१/२०२० , दि. २३.०४.२०२० चे पत्र**

**शासन परिपत्रक**

सध्याच्या कोविड -१९ या महामारीच्या परिस्थितीमध्ये सदर आजाराने मृत झालेल्या मृतदेहाची हाताळणी करण्याबाबत. केंद्र शासनाने मृतदेह हाताळणीबाबत दि. १५/३/२०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यातील कोविड-१९ वा तत्सम आजाराने मृत पावलेल्या व्यक्तींच्या मृतदेहाची हाताळणी करण्याबाबत केलेल्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत. राज्यामध्ये ज्या ज्या रूग्णालयात कोविड-१९ वा तत्सम आजाराने व्यक्ती मृत पावल्या आहेत त्या ठिकाणी मृतदेहाची हाताळणी पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

**अ) विलगीकरण कक्ष किंवा अपघात विभागात मृतदेह हाताळणी-**

खालील सर्व बाबी त्या ठिकाणी कर्तव्यावर असलेल्या परिसेविकेच्या देखरेखीखाली होतील . विलगीकरण कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांचे infection control बाबत वेळोवेळी प्रशिक्षण घेण्यात यावे.

१) मृतदेह हाताळणाऱ्या कर्मचाऱ्याने हात निर्जंतुक करावे व मृतदेह हाताळतांना (PPE) /व्यक्तिगत सुरक्षा साधनांचा वापर करावा.

२) मृतदेहातील सर्व नळया व इतर वैद्यकीय साधने / उपकरणे सुरक्षितपणे काढावीत.

३) मृतदेहावरील वैद्यकीय उपचारादरम्यान तयार झालेली सर्व छिद्रे सोडियम हायपोक्लोराईट द्रवाने निर्जंतुक करावीत व त्यावर अशा प्रकारे पट्टी लावावी की त्यामधून कुठल्याही प्रकारची गळती होणार नाही.

४) शरीरावरील धारदार व टोकदार वैद्यकीय उपकरणे ही कडक प्लॅस्टिकच्या डब्यात (सुया .उदा) जमा करावीत.

५) तोंड व नाकपुडया हयामध्ये कापूस घालावा जेणेकरुन त्यामधून शारिरिक द्रव बाहेर येणार नाही.

६) विलगीकरण कक्षातून मृतदेह इतरत्र हलविण्या अगोदर मृत व्यक्तीच्या कुटुंबाने मृतदेह पाहण्याची इच्छा दर्शविल्यास त्यांना योग्य ती खबरदारी घेऊन मृतदेहाचे दुरून दर्शन घेण्यास परवानगी द्यावी.

कृ.मा.प.

७) मृतदेह प्लॅस्टिक पिशवीमध्ये (Leak proof plastic bag) अथवा रुग्णालयाने पुरवलेल्या बॅगमध्ये ठेवावा व त्या बॅगचा बाहयभाग १% सोडियम हायपोक्लोराईटने निर्जंतुक केल्यानंतर Mortary Sheet मध्ये किंवा मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी पुरवलेल्या कापडामध्ये गुंडाळावा.

८) मृत व्यक्तीने वापरलेले कपडे व इतर वापरलेल्या वस्तु हया एका जैविक घातक कचरा (Bio hazardous waste) पिशवीत टाकावे व तिचा पृष्ठभाग १% सोडियम हायपोक्लोराईटने निर्जंतुक करावा.

९) मृत व्यक्तीसाठी वापरलेली उपकरणे विहित केलेल्या पध्दतीनुसार निर्जंतुकीकरण यंत्राने अथवा निर्जंतुकीकरण द्रवाने स्वच्छ करुन घ्यावीत. (प्रचलित जंतुसंसर्ग टाळण्याच्या प्रणालीनुसार)

१०) मृतदेहाशी संबंधित सर्व वैद्यकीय कचरा हा व्यवस्थित हाताळून त्याची जैविक कचरा व्यवस्थापन नियमांप्रमाणे विल्हेवाट लावावी.

११) मृताच्या नातेवाईकांच्या भावनांचा आदर ठेवून त्यांना योग्य ते समुपदेशन करण्यात यावे.

१२) मृतदेह ताब्यात देण्यापूर्वी नातेवाईक/वारस यांना मृतदेह १ मीटर अंतरावरुन दाखवावा व त्यावेळी त्यांनी वैयक्तिक संरक्षणात्मक साधन घातलेले असावे.

१३) जर मृत्युचे कारण हे Covid-१९ असे (सिध्द झालेले / संशयित) असेल तर मृतदेह विलगीकरण कक्षातूनच नातेवाईकांना जवळच्या स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी परस्पर हस्तांतरित करावा किंवा काही अडचण असल्यास /नातेवाईक उपलब्ध नसल्यास / वारसदार विलगीकरण कक्षात भरती असल्यास शवगृहात राखून ठेवावा. कोणत्याही परिस्थितीत मृतदेहाचे जतन नातेवाईकांनी करून नये.

१४) ज्या आरोग्य कर्मचाऱ्याने मृतदेह हाताळलेला आहे त्यांनी त्यांचे वापरलेली वैयक्तिक संरक्षणात्मक साधने (PPE) लाल पिशवीत टाकावीत व हात स्वच्छ धुवून घ्यावेत.

१५) शव बांधण्याकरिता नातेवाईकांची मदत घेऊ नये.

**ब) शवकक्ष सेवक / कर्मचारी यांनी कोरोना बाधित किंवा संशयित मृतदेह शवगृहामध्ये हाताळताना घ्यावयाची खबरदारी-**

१) मृतदेह हाताळणारे शवगृहातील सर्व कर्मचारी यांना वेळोवेळी जंतुसंसर्ग टाळण्याचे प्रशिक्षण देण्यात घ्यावे.

२) सर्व संबंधित कर्मचारी यांनी सर्व प्रकारची व्यक्तिगत संरक्षणात्मक साधने उदा. मास्क, हातमोजे इत्यादी वापरावीत.

३) ३) जर मृत्यु Covid-१९ आजारामुळे झाल्याचे निदान झालेले असेल तर तो मृतदेह विलगीकरण कक्षातूनच नातेवाईकांच्या ताब्यात परस्पर देण्यात यावा, तत्पूर्वी स्थानिक पोलिस ठाण्यात कळवावे व त्याची नोंद ठेवावी.

४) शवगृहातील काही बॉक्सेस हे Covid-१९ निधन झालेल्या मृतदेहासाठी राखून ठेवावेत व त्या बॉक्सेसवर सुस्पष्ट अक्षरात नामांकन करावे.

५) मृतदेह शवगृहात ०४ डिग्री से.तापमानात ठेवावा .

६) शवागृह व त्यांच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा.

७) शवागृहातले पृष्ठभाग, उपकरणे व मृतदेह ने-आण करण्यासाठी वापरात येणारी ट्रॉली हे १% सोडियम हायपोक्लोराईटने निर्जंतुक करावे.

८) मृतदेह, शव परिक्षणासाठी काढल्यानंतर सदरील रॅक, त्याचे हँडल व आतील पृष्ठभाग १% सोडियम हायपोक्लोराईटने निर्जंतुक करावे.

...3

९) मृताच्या नातेवाईकांनी मृतदेहाचा चेहरा पाहण्याची इच्छा व्यक्त केली तर योग्य ती सर्व खबरदारी घेऊन विलगीकरण कक्षातच दुरून चेहरा पाहण्याची परवानगी द्यावी.

१०) मृतदेहावर कोणत्याही प्रकारचे चिन्हांकन करण्यात येऊ नये.

**क) शववाहिनी चालकाने Covid-१९ मृतदेह बाधित किंवा संशयित मृतदेह हाताळताना घ्यावयाची खबरदारी.**

१) शववाहिनी चालक व त्याचा मदतनीस यांना जंतुसंसर्ग टाळण्याचे प्रशिक्षण वेळोवेळी देण्यात यावे व त्यांनी सुध्दा स्वत:ला प्रशिक्षित करुन घ्यावे.

२) चालक व त्याचा मदतनीस यांनी वैयक्तिक संरक्षणात्मक साधने घालावे. (उदा. हातमोजे इत्यादी.)

३) चालकाने नेहमी अधिकचे संरक्षात्मक साधन आपल्या गाडीत ठेवावे. त्यांना सुदृढ मृतदेह उचलण्यासाठी नातेवाईकांची मदत लागू शकते. अशावेळी ती उपयोगी पडतील.

४) मृतदेह अंतिम विधीसाठी पोहचविल्यानंतर शववाहिनीचा आतील भाग व मृतदेह ने-आण करण्याची ट्राली याचे तात्काळ १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईटने निर्जुंतुकीकरण करावे.

**ड) शववाहीनीतून मृतदेहाची पाठवणी करतांना घ्यावयाची काळजी-**

१) जर व्यक्ती कोरोना विषाणुमुळे मृत झालेला असेल तर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी शववाहीनीतून अंत्यविधीच्या ठिकाणी मृतदेह लगेचच नेण्याची तयारी करावी. (मृतदेहास कुठल्याही परिस्थितीत घरी नेण्यात येवू नये) स्थानिक प्रशासनाने याबाबत नियमित सुचनांचे तंतोतंत पालन करावे व नातेवाईकांना तेथे पोहोचण्यासाठी सांगण्यात यावे.

२) मृतदेहाची ओळख फक्त वारसदार किंवा त्यांनी नेमून दिलेल्या व्यक्तिंनी पटवून घ्यावी व त्यावेळी वैयक्तिक संरक्षात्मक साधन वापरावीत व सुरक्षित अंतरावरून निरिक्षण करावे.

३) शववाहिनी आल्यानंतर मृतदेह स्विकारताना तो कपडयामध्ये व्यवस्थित कापडामध्ये गुंडाळलेल्या व सोडीयम हायपोक्लाराईटने (१ टक्के) ने निर्जुंतक करून घेतलेल्या प्लास्टीकच्या आवरणात स्विकारावा/ ताब्यात घ्यावा.

४) मृतदेह स्विकारल्यानंतर लगेचच शववाहिनीत ठेवावा.

**इ) मृतदेहाची विल्हेवाट लावण्याच्या ठिकाणी अंत्यविधीच्या वेळी घ्यावयाची काळजी.**

१) नातेवाईकांना मृतदेहाच्या चेहऱ्याचे शेवटचे दर्शन देण्यासाठी प्लॅस्टिक बॅग उघडू नये, त्याची कर्मचाऱ्यांने / नातेवाईकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी. चेहऱ्याचे दर्शन एक मिटर दुरुनच द्यावे.

२) अंत्यविधीच्या वेळी धार्मिक मंत्र पठण करणे किंवा दुरून पवित्र पाणी शिंपडणे किंवा इतर धार्मिक विधी दुरून करण्यास मुभा राहील.

३) मृतदेहाला अंघोळ घालणे, चुंबन घेणे, मिठी मारणे, तोंडात पाणी सोडणे इत्यादी बाबींस प्रतिबंध राहील.

४) अंत्यविधीसाठी उपस्थित असलेल्या नातेवाईकांनी परस्परामध्ये किमान एक मीटरचे अंतर ठेवावे.

५) अंत्यविधीनंतर सर्वांनी हात स्वच्छ धुवुन निर्जुंतक करुन घ्यावेत.

नातेवाईकांनी अंत्यविधीवेळी जास्त गर्दी करु नये व परस्परामध्ये अंतर ठेवावे कारण नातेवाईकांपैकी किंवा कुटुंबातील व्यक्तींना संसर्ग झालेला असू शकतो किंवा ते विषाणूचा प्रसार करण्यास कारणीभूत ठरु शकतात.

६) अंत्यविधीच्या ठिकाणी निर्माण झालेला जैविक कचरा इतर कोठेही टाकू नये. जंतुसंसर्ग टाळण्यासाठी त्याची विल्हेवाट जैविक कचरा व्यवस्थापन नियमाप्रमाणे लावावी.

**ई) अंत्यविधीनंतर घ्यावयाची काळजी.**

१) मृतदेहाची राख गोळा करण्याने विषाणू संसर्गाचा कुठल्याही प्रकारचा धोका उद्भवत नाही.

२) मृताचे कपडे नष्ट करावेत किंवा जाळून टाकावेत किंवा जैविक कचरा विल्हेवाट नियमाप्रमाणे स्मशानभूमी / कब्रस्तानमध्ये / सिमॅटेरीमध्ये त्यांची विल्हेवाट लावावी.

३) स्मशानभूमी / कब्रस्तान/ सिमॅटेरी सोडण्यापूर्वी सर्वांनी स्वच्छ हात धुवून घ्यावेत. कुटुंबातील सर्व व्यक्ती नातेवाईक व मित्रमंडळी जी मयताच्या शेवटच्या चौदा दिवसाचा काळात मृतव्यक्तीच्या अधिक संपर्कात होते अशांनी जवळच्या शासकिय आरोग्य केंद्रास भेट देऊन वैद्यकिय सल्ला व मदत व उपचार घ्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

12-5-2020

(डॉ. प्रदीप व्यास)

प्रधान सचिव

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ

६. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य.

७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय,मुंबई.

८. सर्व विभागीय आयुक्त

९. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय

१०. आयुक्त, सर्व महानगरपालिका

११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

१२. सर्व पोलीस आयुक्त

१३. सर्व पोलीस अधिक्षक

१४. संचालक, आपती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.

१५. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

१६. संचालक, आरोग्य सेवा-१, मुंबई.

१७. संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे.

१८. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.

१९. उप संचालक, आरोग्य सेवा, सर्व मंडळे.

२०. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.

२१. निवडनस्ती (आरोग्य-३)